वाचा :- १. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक दिनांक २२/०२/२०१९.
२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.गाजप्र.- २०१९/प्र.क्र.१३६/पंरा-४ दिनांक २१/०१/२०२०

---

क्र.गावठाण/ड्रोन सर्व्हे/SOP/प्र.क्र. १४२/२०२०
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचे कार्यालय पुणे
पुणे, दिनांक :- २३/ ११ /२०२०

**प्रस्तावना-**

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणामधील जमिनींचे GIS आधारीत सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतचा गावठाण जमाबंदी प्रकल्प ग्रामविकास विभाग, जमाबंदी आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय व भारतीय सर्वेक्षण विभाग, भारत सरकार यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यास उपरोक्त वाचा सदरी नमुद क्र.१ चे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आली आहे. या प्रकल्पाअंतर्गत गावठाण भूमापन न झालेल्या (महानगर पालिका, नगरपालिका, नगरपरिषद क्षेत्र वगळता) सर्व गावांचे गावठाण भूमापन करुन मिळकत पत्रिका स्वरुपात अधिकार अभिलेख व गावातील मालमत्तांचे GIS प्रणालीवर आधारीत मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे योजनेच्या आधारावर, केंद्र शासनाने गावामधील रहिवासासाठी मिळकतीचे स्वामित्व अधिकार देणेसाठी स्वामित्व योजना संपूर्ण देशामध्ये सुरू केली आहे. गावठाण भूमापन प्रकल्प राबविण्याबाबत ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. गाजप्र-२०१९/प्र.क्र.१३६/पंरा दि. २१/१/२०२० अन्वये मार्गदर्शक सुचना देण्यात आलेले आहेत. भूमि अभिलेख विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गावठाण भूमापन प्रकल्प स्वामित्व योजना राबविताना करावयाची कार्यवाही बाबत सविस्तर सूचना या परिपत्रकाव्दारे देण्यात येत आहेत.

**परिपत्रक-**

गावठाण भूमापन प्रकल्प योजनेत भारतीय सर्व्हेक्षण विभाग (सर्व्हे ऑफ इंडिया) मार्फत ड्रोनद्वारे गावठाणातील मिळकतींचे सर्वेक्षण करुन प्रतिमांचे भूसंदर्भीकरण (Geo-referencing) व ऑर्थोरेक्टेफिकेशन करण्यात येईल, तसेच गावठाणातील मिळकतींचा डिजिटाईजड् नकाशा तयार करण्यात येईल. सदर नकाशामधील मिळकतींना (GIS data) ग्रामपंचायतींचे मिळकत रजिष्टर (८ - MIS data) जोडण्यात येईल. गावाच्या गावठाण हद्दीतीलच मिळकतींची नियमाप्रमाणे मालकी हक्काची चौकशी करण्यात येऊन, त्याबाबत आज्ञावली विकसीत करुन मिळकत पत्रिका व सनदा भूमि अभिलेख विभागामार्फत तयार करण्यात येतील व जनतेस सनदा सशुल्क देण्यात येतील.

**ड्रोन व्दारे गावठाण भूमापनामध्ये कर्मचारी व अधिकारी यांच्या जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील.**

**१. भूकरमापक संवर्गातील कर्मचा-यांच्या जबाबदाऱ्या:-**

**१.१. ड्रोनद्वारे गावठाण भूमापनाची पूर्वतयारी :-**

**१.१.१. ग्रामसभा :-**

१.१.१.१. उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या मान्यतेने, गट विकास अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली, व संबंधीत गावाचे ग्रामसेवक यांचे मदतीने ग्रामसभेचे आयोजन करणे.

१.१.१.२. गावातील ग्रामस्थांमध्ये ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेबाबत जागृकता निर्माण करणे.



Scanned by CamScanner

१.१.१.३. ग्रामविकास विभागाकडील दिनांक २१/०१/२०२० परिपत्रकातील परिशिष्ट ब येथील जाहीर निवेदनातील तपशील ग्रामसेवकाच्या मदतीने ग्रामस्थांना समजावून सांगणे.

**१.१.२. गावठाण हद्दनिश्चिती :-**

१.१.२.१. संबंधीत गावाचे तलाठी यांचेकडून गावठाणालगतचे (स.नं./ ग.नं.) धारकांचे ७/१२ व धारकांचे पत्ते, गावठाण हद्द निश्चित करणेकामी नोटीस देण्यासाठी उपलब्ध करुन घ्यावेत.

१.१.२.२. उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचे मार्गदर्शनाखालील गावठाण हदद निश्चिती प्रचलित नियमानुसार करणे. गावठाण हदद निश्चिती GPS रोव्हर उपलब्ध होईपर्यंत ई.टी.एस मशिनव्दारे करावी.

१.१.२.३. महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमाचिन्हे) नियम १९६९ मधील नियम क्र.३ (अ) ३ प्रमाणे ओबडधोबड आकाराचे लांबुडके दगड किंवा अन्य कोणत्याही तात्पुरत्या स्वरुपाच्या सामुग्रीने हददीच्या खुणा गावठाणच्या हददीवर उभारण्यात याव्यात. (टिप-नगर भूमापन नियम पुस्तिका नियम क्र. ३२ मध्ये Theodolite Stone बाबत तरतुद आहे कृपया वाचावे.)

१.१.२.४. गांवठाण भूमापन योजनेअंतर्गत, गांवठाण हद्दीतीलच मिळकतींचे मिळकत पत्रिका व सनदा तयार करण्यात येणार आहे त्यामुळे गांवठाण हद्दीचे हद्द निश्चीतीचे सिमांकन काम अचूक करावे.

**१.१.३. नोटीसा बजावणे :-**

गावातील गावठाणातील मिळकतधारकांना ड्रोनद्वारे गावठाण भूमापन, सिमांकन, ड्रोन फ्लाईंग व चौकशी कामाची माहिती व्हावी; त्यांचे मिळकतीचे अचूक सिमांकन व्हावे, शासकीय व सार्वजनिक मिळकतीचे योग्य प्रकारे रक्षण व्हावे यासाठी गांवठाण हद्दीतील सर्व मिळकत धारकांना माहिती होणे अपेक्षीत आहे. त्यांना माहिती होणेकामी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबवावी.

१.१.३.१. गावठाण भूमापना संबंधी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या नोटीसा गावाचे चावडी / ग्रामपंचायत कार्यालयामध्ये प्रसिध्द करणे.

१.१.३.२. गावठाणातील मिळकतधारक सदर गावातच राहात असल्यास मिळकत धारकास दयावयाची नोटीस व त्यांचे घ्यावयाचे निवेदन / स्वयंघोषणापत्र हे एकत्र घेण्यात यावे.

१.१.३.३. गावात न रहाणा-या गांवठाणातील मिळकत धारकांना गावठाण भूमापन संबंधी सर्व नोटीसा पोष्टाद्वारे पाठविण्यात याव्यात. नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत याची खात्री करण्यात यावी.

१.१.३.४. मिळकतधारक सिमांकन करण्यासाठी व जबाब / निवेदन / स्वयंघोषणापत्र देण्यासाठी हजर न राहिल्यास व पत्ता उपलब्ध असल्यास संबंधितांना नोटींस पोष्टाने पाठविण्यात यावी. तसेच संबंधित धारकाचा मोबाईल नंबर उपलब्ध असल्यास एस.एम.एस. अथवा सोशल मिडिया मार्फत नोटीस पाठविण्यात यावी.

१.१.३.५. अ.क्र. १.१.३.२. ते १.१.३.४. मधील पर्याय वापरूनही नोटीस बजावणी करता येत (पत्ते माहित नसल्यास, नोटीस बजावली जात नाही, मोबाईल नंबर उपलब्ध नसल्यांस.) नसल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३० (१) प्रमाणे नोटिसा बजाविण्यात याव्यात.

**१.१.४. गांवठाण हद्दीतील झाडाखालील मिळकतींची मोजणी व ग्राऊंड ट्रुथिंग :-**

१.१.४.१. वरकरणी गावातील मिळकतींची पहाणी करुन झाडाखाली येणाऱ्या मिळकती व इतर कारणांमुळे ड्रोन छाया चित्रणामध्ये न दिसणाऱ्या मिळकतीची मोजणी ई.टी.एस.मशिनने / GPS रोव्हर द्वारे करावी. ई.टी.एस. मोजणी/ GPS रोव्हर नकाशा P.U.T. नकाशा या नावाने उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या मान्यतेने जमाबंदी आयुक्त कार्यालय नागरी भुमापन शाखेस पाठवावा. सदर काम शक्यतो मुद्दा क्रमांक १.२ व १.३ चे कामे करताना करावे. P.U.T. (Property under tree)



Scanned by CamScanner

१.१.४.२. ग्राऊंड ट्रुथिंग साठी चार ते सहा मिळकतींची मोजणी ई.टी.एस. मशिनने /GPS रोवर वापरून करावी. ई.टी.एस./ GPS रोवर मोजणी नकाशा P.F.G.T. या नावाने उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या मान्यतेने जमाबंदी आयुक्त कार्यालय नागरी भुमापन शाखेस पाठवावा. P.F.G.T.(Properties for Ground Truthing)

१.१.४.३. वाचा सदरी नमूद दिनांक २१/०१/२०२० चे परिपत्रकातील सूचनान्वये गाव स्तरीय सनियंत्रण व अंमलबजावणी समितीचे सदस्य सचिव म्हणुन काम पहाणे.

**१.२. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करावयाच्या आदल्या दिवशीची तयारी :**

मिळकतींचे सिमांकन, ड्रोन फ्लाईगचा दिनांक, इ. पुर्व तयारीची कामे करण्यासंबंधी गावठाणातील मिळकत धारकांना, त्यांचे परिचित लोकांना संदेश तोंडी अथवा सोशल मिडीया मार्फत देण्यात यावा.

**१.२.१. मिळकतींचे सिमांकन :-**

प्रस्तुत योजनेमध्ये मिळकतींचे सिमांकन हा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे सिमांकन अत्यंत काळजीपूर्वक व गांभिर्याने करावे. गांवठाण हद्दीतील सर्व मिळकतींचे व प्रत्येक मिळकतीचे चहुबाजुचे संपूर्ण सिमांकन चुना पावडरने केले जाईल याची दक्षता घ्यावी. सिमांकनाबाबतचा मार्गदर्शक नकाशा व वापराची कार्यपध्दती यासोबत **परिशिष्ट १** मध्ये जोडली आहे. त्याप्रमाणे सिमांकन करावे.

१.२.१.१. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करतांना गावाचे गावठाण हददीतील खाजगी मिळकतींचे सिमांकन मिळकत धारकांकडून करुन घ्यावे. सिमांकन केल्याबद्दलचे मिळकत धारकांचे निवेदन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट २** मधील नमुन्यात घ्यावे.

१.२.१.२. ग्रामपंचायत घर / मिळकत क्रमांक शक्य असल्यास घरांच्या छतांवर अथवा मिळकतीच्या हद्दीत घराच्या मागे किंवा पुढे अंगणामध्ये / जमिनीवर योग्य त्या साधनांच्या आधारे ड्रोन इमेजवर दिसेल अशा रितीने टाकावा. जमिनीवर घर क्रमांक टाकला असेल तर तो बाणाने कोणत्या मिळकतीचा आहे हे दर्शविणेत यावे.

१.२.१.३. गावातील सरकारी, सार्वजनिक, ग्रामपंचायत मिळकती, धार्मिक स्थळे, खुली जागा, नाला, इ. चे सिमांकन तलाठी, ग्रामसेवक व ग्रामस्थ यांचे मदतीने करुन घ्यावे.

१.२.१.४. गावाचे गावठाण हददीतील खाजगी, शासकीय व निमशासकीय मिळकतींचे धारक यांना मिळकतींचे सिमांकन करण्यास सहकार्य करावे.

१.२.१.५. खाजगी, शासकीय, निमशासकीय, सार्वजानिक मिळकतींचे सिमांकन करतेवेळी वाद झाल्यास मिळकतधारक व सर्व संबंधित यांचे समपुदेशन करणे. समपुदेशनानंतरही मिळकतींच्या हददीबाबत वाद झाल्यास, दोन्ही मिळकत धारकांच्या दाव्यानुसार दोन लाईनने (वादाच्या हददीबाबत) लाल रंगाच्या चुना पावडरच्या साहाय्याने सिमांकन करावे. **वादाची नोंद नमुना १** मधील विवादग्रस्त सिमांकन नोंदवही मध्ये ठेवावी.

१.२.१.६. खाजगी मिळकत धारकाने, गावात न राहण्याऱ्या मिळकत धारकाने सिमांकन न केल्यास त्या मिळकतीचे सिमांकन ग्रामसेवकाच्या अथवा शेजारील मिळकत धारक अथवा माहीतगार व्यक्ती यांच्या मदतीने ग्रामपंचायत नमुना नंबर ८ चे क्षेत्रास मेळ घेऊन करावे. त्याची नोंद नमुना नंबर २ मधील टाचण नोंदवहीमध्ये ठेवावी.

१.२.१.७. फक्त बांधीव मिळकत असेल व त्यासोबत आंगण, खुली जागा नसेल तर अशा मिळकतींचे सिमांकन करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सिमांकन करण्यात येऊ नये.

१.२.१.८. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करतांना खुल्या, मोकळया जागा, गावातील रस्ते, शासकीय/सार्वजानिक मिळकतींच्या हक्कांस बाधा होणार नाही याची काळजी घेणे.



Scanned by CamScanner

१.२.१.९. गावाचे गावठाण हददीतील सर्व मिळकतींचे सिमांकन झालेले आहे याची खात्री करावी **सिमांकन प्रमाणपत्र (परिशिष्ट ३ब)** उप अधीक्षक भूमि अभिलेख यांना सादर करावे.

१.२.१.१०. नकाशातील गावठाण हद्दीतील मिळकतीच्या चोहोबाजुच्या सीमा ग्रामपंचायत क्षेत्राशी मेळ घेऊन चिन्हांकित कराव्यात.

**अत्यंत महत्वाचे :-**

गावठाणातील मिळकतींचे अचूकपणे चहोबाजूनी सिमांकन झाल्यास फिचर एक्स्ट्रॅक्शन व डिजीटायझेशनचे काम जलद होईल. परिणामी योजनेचे काम विहीत वेळेत कमी श्रमात पूर्ण होईल अन्यथा डिजीटायझेशन व नकाशे अंतिम करण्याच्या कामामध्ये डुप्लीकेशन, पुन्हा मोजणी व मोझॅकींग संबंधी प्रश्न / अडचणी निर्माण होऊन योजनेचे काम वेळेत व गुणवत्तापूर्ण होणार नाही. त्यामुळे सिमांकनाकडे विशेष लक्ष दयावे.

**१.३. ड्रोनद्वारे प्रत्यक्ष भूमापनाच्या दिवशी :-**

१.३.१. भारतीय सर्व्हेक्षण विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ड्रोन उड्डाण व छायांकनाकामी आवश्यकतेनुसार सहकार्य करणे.

१.३.२. अगोदरच्या दिवशी केलेले सिमांकन व्यवस्थित आहे किंवा नाही यांची गावात फेरफटका मारुन वरकरणी पाहणी करावी. काही कारणामुळे चुन्याचे मार्किंग नष्ट / खराब झाल्यास ते पुर्ववत करुन घेणे.

१.३.३. ड्रोन फ्लाईंग पुर्ण झाल्याबाबतचे भारतीय सर्व्हेक्षण पथकाकडील संयुक्त प्रमाणपत्र स्वाक्षरीत करावे.

**१.४. ड्रोन फ्लाईंगनंतर :-**

१.४.१. ग्रामपंचायत घर / मिळकत क्रमांकाची नोंद — ड्रोन फ्लाईंगनंतर गावाच्या ड्रोन नकाशे प्राप्त झाल्यावर अशा नकाशावर गावठाणाच्या आतील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक काळया शाईने नमुद करावे. मिळकत क्रमांक नमुद करणे कामी ग्रामसेवक यांचे सहकार्य घ्यावे. (ड्रोन नकाशामध्ये नंबर दिसत असलेस असे करणेची आवश्यकता नाही.) चालता क्रमांक देण्यात यावेत.

१.४.२. ड्रोन ईमेजचे फिचर एक्स्ट्रॅक्शन / डिजिटायझेशन संबंधीचे कामे भारतीय सर्व्हेक्षण विभागामार्फत करण्यात येणार आहे, त्यांना आवश्यक ती मदत उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचे मार्गदर्शनानुसार करावी.

१.४.३. १.४.२. मधील काम पूर्ण झालेनंतर प्रत्येक गावातील १००% मिळकतींचे फिचर एक्स्ट्रॅक्शन डिजीटायझेशन व्यवस्थित झालेले आहे किंवा नाही याची तपासणी व ग्राऊंड ट्रुथिंग साठी केलेल्या मोजणी नकाशाच्या आधारे भारतीय सर्व्हेक्षण विभागाने पुरविलेल्या नकाशा बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करावी.

१.४.४. गावातील गांवठाणामधील रस्ते, नाले, सार्वजानिक मिळकती व इतर मिळकती या डिजिटाईज्ड नकाशामध्ये बंदिस्त झालेल्या आहे किंवा नाही याची तपासणी करणे. जेणेकरुन गांवठाणातील सर्व जमीन / मिळकत / जागेचा नकाशा तयार होवून त्यांस नगर भूमापन क्रमांक दिला जाईल. (थोडक्यात गांवठाणाचे एकूण क्षेत्र अचूक निर्धारीत करता आले पाहिजे अशारितीने).

१.४.५. मिळकतपत्रिकांची व सनदेची तपासणी करणे. मिळकतपत्रिका व सनदा डिजीटल साईन करणेकामी उप अधीक्षक भूमि अभिलेख ठरवून देतील ती कामे करणे.

१.४.६. सनदांचे वाटप करणे, सनद फी नियमाप्रमाणे वसुल करणे, वसुल झालेली सनद फी जमाबंदी आयुक्त कार्यालय ठरवून देतील त्या बँक खात्यामध्ये व पध्दतीने जमा करणे. (ड्रोनद्वारे गावठाण भुमापनामध्ये जमा झालेली सनद फी शासकीय कोषागारामध्ये भरण्याची नाही. कारण उपरोक्त बाचा



Scanned by CamScanner

सदरी नमूद क्रमांक १ चे शासन निर्णयान्वये ड्रोनद्वारे गावठाण भुमापनामध्ये वसुल झालेली सनद फी रोलींग पध्दतीने गावठाण भुमापन कामासाठी वापरण्याची परवानगी दिलेली आहे.)

१.५. **संकीर्ण:-**

१.५.१. उपरोक्त वाचा सदरी नमूद क्र. १ व २ चे शासन निर्णय व परिपत्रकाचे वाचन करावे व त्यामधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

१.५.२. **पडताळणी सूची ३अ, ३ब, ३क व ३ड** मध्ये विहित माहिती भरुन वेळोवेळी उप अधीक्षक कार्यालयास सादर करणे.

२. **परीरक्षण भूमापक / निमतानदार यांची जबाबदारी :-**

२.१. भुकरमापक यांनी केलेल्या उपरोक्त कामाची तपासणी आवश्यक त्या प्रमाणात करून कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी परीरक्षण भुमापक/ निमतानदार यांची राहील.

२.२. पुरेशा प्रमाणात भुकरमापक संवर्गातील कर्मचारी उपलब्ध नसल्यास उपरोक्तप्रमाणे कामे परीरक्षण भुमापक/ निमतानदार यांनी करणेची आहे.

२.३. मिळकतपत्रिका व सनदेची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने भूकरमापक यांनी तपासणी केलेल्या मिळकत पत्रिका व सनद यांची तपासणी कार्यालय प्रमुख हे ठरवून देतील त्याप्रमाणात करणेत यावी.

३. **शिरस्तेदार यांची जबाबदारी :-**

भुकरमापक व परीरक्षण भुमापक / निमतानदार यांनी केलेल्या उपरोक्त कामाची तपासणी आवश्यक त्या प्रमाणात करून कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी शिरस्तेदार यांची राहील.

४. **उपअधीक्षक भूमि अभिलेख / चौकशी अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :-**

४.१. **ड्रोन फ्लाईंगपूर्वी :-**

४.१.१. स्वत:ची व कार्यालयातील सर्व वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या डिजिटल सिग्नेचर प्राप्त करुन घेणे.

४.१.२. **ग्रामपंचायत नमुना ८-**

४.१.२.१ ड्रोनद्वारे गांवठाण भूमापन करावयाचा प्रत्येक गावाचा ग्रामपंचायत नमुना ८ ची छायाप्रत व संगणकीकृत डाटा सॉफ्ट कॉपी मध्ये प्राप्त करुन घ्यावा. त्यामध्ये धारकाचे नांवे, मोबाईल नंबर, पत्ते, इ. तपशील नमुद करुन घ्यावेत.

४.१.२.२. ग्रामपंचायत नमुना ८ चे नोंदवही मधील प्रलंबित फेरफाराच्या नोंदी, वारस नोंदी, इ. अद्ययावत आहे याची खात्री करावी, नसल्यांस सदर बाब गटविकास अधिकारी यांचे निदर्शनास आणून नियमाप्रमाणे कार्यवाही करणेची त्यांना विनंती करावी. फेब्रुवारी २०१९ नंतर ग्रामपंचायत घर क्रमांकाच्या नविन नोंदी झालेल्या असल्यांस अशा नोंदीबाबत कायदेशीर पुराव्याची खात्री करुनच चौकशी अधिकारी यांनी नियमाप्रमाणे योग्य तो निर्णय घ्यावा. फेब्रुवारी २०१९ नंतर फक्त खरेदी-विक्री, वारस, मृत्युपत्र इ. कायदेशीर हस्तांतरण झालेली फेरफार चौकशी अधिकारी यांनी विचारात घ्यावेत.

४.१.२.३. प्रत्येक गावातील उपरोक्त ४.१.२.२. प्रमाणे ग्रामपंचायत नमुना ८ च्या आधारे मिळकतनिहाय तपशील जमाबंदी आयुक्त कार्यालयाने ठरवून दिलेल्या नमुन्या मध्ये व सोबतच्या परिशिष्ट ४ मधील प्रोटोकॉलप्रमाणे संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी यांचे मदतीने हार्ड व सॉफ्ट कॉपी मध्ये प्राप्त करुन घेणे.

४.१.२.४. प्राप्त झालेला डाटा प्रोटोकॉलप्रमाणे आहे किंवा नाही याची खात्री करणे, नसल्यास तो गटविकास अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावे.



Scanned by CamScanner

४.१.३. तालुक्यातील गावठाण भूमापन करावयाच्या गावांचा गावठाण हद्द निश्चितीचा कार्यक्रम तयार करणे. गावठाण हद्द निश्चिती करून घेणे. भारतीय सर्व्हेक्षण विभागाने क्लस्टर मॅप पुरविले असेल तर त्यामधील गावांच्या गावठाणाच्या हद्दी प्रथम प्राधान्याने निशचित करुन घेण्यात याव्यांत.

४.१.४. तालुकास्तरीय समितीच्या बैठका सदस्य सचिव या नात्याने आयोजित करुन गांवठाण भूमापन करावयाच्या संबंधी समन्वय राखणे.

४.१.५. संबंधीत तालुक्याचे तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस स्टेशन, तालुक्यामध्ये विमान प्राधिकरण व लष्कर विभाग यांचे कार्यालय असल्यास त्यांना वेळोवेळी ड्रोनद्वारे गावठाण भूमापनामध्ये करावयाच्या कामाची माहिती (उदा. चुना मार्किंग,ड्रोन फ्लाईंग इ.) देण्यात यावी.

४.१.६. दरदिवशी ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करावयाच्या कामाचे नियोजन गटविकास अधिकारी यांचे सल्लामसलतीने करणे व नियोजनास तालुका स्तरावर नोटीसीने प्रसिध्दी देणे.

४.१.७. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेकामी कर्मचाऱ्यांचे नियोजन करणे व त्यांना कामाचे वाटप करणे. आवश्यक असेल ते साहित्य व सामुग्री वित्तीय नियमाप्रमाणे खरेदी करणेबाबत कार्यवाही करणे.

४.१.८. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेच्या आवश्यक त्या सर्व प्रकारच्या नोटिसांना तालुका स्तरावर प्रसिध्दी देणेबाबत कार्यवाही करणे.

४.१.९. तालुक्यातील किमान १०% गावातील ग्राम सभेला हजर रहाणे व गावठाण भूमापन योजनेबाबत माहिती देणे व जनजागृती करणे.

## ४.२. ड्रोन फलाईंगनंतर

४.२.१. गावठांण नकाशाचे सर्व्हे ऑफ इंडिया यांचे मार्फत डिजीटायझेशन करण्याकामी समन्वय ठेवून माहितगार कर्मचारी यांची त्यांचे मदतीसाठी नियुक्ती करणे.

४.२.२. डिजिटाईज नकाशा प्राप्त करुन घेणे. नकाशावरील मिळकतींवर ग्रामसेवक यांचे मदतीने भूकरमापक यांनी नमूद केलेले ग्रामपंचायत मिळकत क्रमांकाचे तपासणी करावी. ड्रोन इमेजमध्ये सर्व मिळकतींचे मिळकत क्रमांक दिसत असलेस तर अशी तपासणी करण्याची आवश्यकता नाही.

४.२.३. गावातील रस्ते, नाले, सार्वजनिक मिळकती व इतर मिळकती ह्या बंदीस्त झाल्या आहेत किंवा नाही याची खात्री भूकरमापक यांनी केली आहे किंवा नाही याची तपासणी करणे. तसेच ग्राऊंड ट्रुथींग मोजणी नकाशाच्या आधारे सर्व्हे ऑफ इंडिया यांनी पुरविलेला ड्रोन नकाशे अचूक व बरोबर झालेले आहे किंवा नाही हे स्वत: तपासावे.

४.२.४. सनद, प्रॉपर्टी कार्ड, नकाशे तयार करून घेणे त्याची तपासणी करणे, मिळकतपत्रिका डिजीटल साईन करणे व महाभूमी संकेतस्थळावर अपलोड करणे.

४.२.५. भारतीय प्रतिभुती मुद्रणालय नाशिक यांचेकडे सनदा डिजिटल साईन करुन छपाईसाठी पाठविणे. छपाई करून सनदा प्राप्त करून घेणे.

४.२.६. जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक क्र. नागरी भूमापन-३/सनद फी आकारणी/प्र.क्र.१३८/२०,दिनांक १२/११/२०२० चे परिपत्रकातील सुचनेप्रमाणे सनद फी ची गणना करणे.

४.२.७. गांव परिरक्षणास घेणेबाबत अधिकार प्रदान करण्यात येत आहे त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

४.२.८. मिळकत धारकांना विहीत सनद फी आकारून सनदांचे वाटप करुन घेणे व जमाबंदी आयुक्त कार्यालय यांनी उपलब्ध करून दिलेल्या बँक खात्यामध्ये जमा करून घ्यावी. सनद फी पूर्ण वसुल करण्याची काळजी घेणे. त्यासंबंधीची लेखे विहीत नियमाप्रमाणे ठेवणे.

४.२.८. गावठाण ड्रोन सर्व्हे मध्ये तयार करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचे प्रचलित नियमाप्रमाणे अ, ब, क, ड वर्गीकरण करुन जतन करणे.



Scanned by CamScanner

४.३. **संकीर्ण:-**

४.३.१. भूकरमापक यांचे कामावर प्रभावी नियंत्रण ठेवणे. भूकरमापक यांनी केलेल्या कामकाजाची वैयक्तीकरित्या तपासणी करावी.

४.३.२. ड्रोनव्दारे गावठाण भूमापन कामामध्ये ग्रामसेवकाकडून उपलब्ध झालेली माहीती बरोबर आहे काय याची खात्री करावी व आवश्यकतेनुसार वापर करावा व आवश्यक ती माहिती जमाबंदी आयुक्त कार्यालयास सादर करावी.

४.३.३. **वित्तीय बाबी-**

गांवठाण हद्द निशचित, झाडा खालील मिळकतींची मोजणी, व ग्राऊंड ट्रुथींगसाठी निधी भूमि अभिलेख कार्यालयांना पुरविणेत येईल. ड्रोन फ्लाईंग व अनुषंगिक कामे जसे फिचर एक्स्ट्रॅक्शन, डिजिटायझेशन इ. स्वामीत्व योजनेखाली येत असल्याने त्या संबंधीचा खर्च भारतीय सर्व्हेक्षण विभागाकडून करण्यात येईल. मात्र, त्यांना त्यांचे आवश्यकतेप्रमाणे मदत करावी. उदा. मनुष्यबळ, साहित्य सामुग्री, वाहन, इ. मात्र, याबाबतची आर्थिक तरतुद भारतीय सर्व्हेक्षण विभागाकडून करण्यात येईल.

४.३.३.१. जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून पुरविण्यात आलेला निधी नियमाप्रमाणे खर्च करणे.

४.३.३.२. विविध बाबींवरील खर्चाचे अभिलेख जतन करणे, लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे,

४.३.३.३. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.

४.३.३.४. अखर्चिक निधी नियमाप्रमाणे जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडे वर्ग करणे.

४.३.४. प्रत्येक गावाची गावनिहाय गावठाण भूमापन कामाची पत्रव्यवहार गावधारीका संधारण करुन घेणे.

५. **जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या जबाबदाऱ्या :-**

५.१. जिल्हा स्तरीय सनियंत्रण व अंमलबजावणी समितीचे सदस्य सचिव म्हणुन काम पहाणे.

५.२. जिल्हयामधील ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करावयाचे गावाचे नियोजन करणे. त्यामध्ये नगर/ गावठाण भूमापन झालेली गावे व नगर भूमापन/ गावठाण भूमापन शिल्लक गावे यांची यादी तयार करणे. जिल्हयातील गावठाण भूमापन करावयाच्या गावांची नावे व संख्या निश्चित करणे.

५.३. विमान प्राधिकरण, संरक्षण विभाग व इतर सक्षम प्राधिकारी यांची ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेसाठी परवानगी भारतीय सर्व्हेक्षण विभाग घेईल. विमान प्राधिकरणाकडून ड्रोन फ्लाईंगसाठी वेळ मिळण्यासाठी भारतीय सर्व्हेक्षण विभागाचे पथकास मदत करणे.

५.४. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करावयाच्या प्रत्येक गावासाठी ड्रोन उडविणेबाबतची माहिती जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, यांना देवून आवश्यकते प्रमाणे परवानगी घेणे.

५.५. ड्रोन फ्लाईंगसाठी सर्व्हे ऑफ इंडियाला आवश्यक ते कर्मचारी / मनुष्यबळ, साहित्य व सामुग्री उपलब्ध करुन देणे. आवश्यकतेनुसार फिचर एक्स्ट्रॅक्शनसाठी / डिजिटायझेशनसाठी जिल्हा किंवा तालुका पातळीवर मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

५.६. जिल्हयामध्ये ड्रोनद्वारे गावठाण भूमापन कामाचे महत्त्व, प्रसिध्दी, लोकप्रतिनिधींना माहिती देणे इ. कामे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे.

५.७. जिल्हयातील ड्रोनद्वारे गावठाण भूमापनचे कामावर, भूकरमापक / उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या कामावर पुर्णपणे नियंत्रण ठेवून काम पुर्ण करुन घेणे.

५.८. ड्रोन द्वारे गांवठाण भूमापन कामासाठी जिल्ह्यातील अधिनस्थ कार्यालयाकडील आवश्यक तेवढे कर्मचारी व अधिकारी यांच्या सेवा वर्ग करणे.

५.९. जिल्ह्यामधील विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख, गांवठाण / शहर मापन व विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख, तथा चौकशी अधिकारी गांवठाण / शहर मापन यांच्या कार्यालयातील



Scanned by CamScanner

अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा ड्रोन द्वारे 'गांवठाण भूमापन कामासाठी वर्ग करुन प्रथम' प्राधान्याने वापरण्यात याव्यात.

५.१०. भूमि अभिलेख विभागाची पुनर्रचना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र.आस्था/१०९३/प्र.क्र.१९/ल-१, मंत्रालय मुंबई दिनांक १८/०८/१९९४ च्या शासननिर्णया प्रमाणे गांवठाण जमाबंदी प्रकल्पाकरिता स्वतंत्र कार्यालय निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील अधिनस्थ कार्यालयाचा कामकाजाचा भार लक्षात घेवून प्रस्ताव सादर करावे.

६. उपसंचालक भूमि अभिलेख यांची जबाबदारी :-

६.१. कार्यक्षेत्रातील ड्रोनद्वारे गावठाण भूमापन कामकाजावर नियंत्रण ठेवणे व अचूक पध्दतीने गावठाणद्वारे ड्रोन सर्व्हेची सर्व कामे करून घेणे.

६.२. अधिनस्थ कार्यालयास व गावास वेळोवेळी भेटी देवून कामाची गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.

६.३. ड्रोन द्वारे गांवठाण भूमापन कामासाठी विभागातील अधिनस्थ कार्यालयाकडील आवश्यक तेवढे कर्मचारी व अधिकारी यांच्या सेवा वर्ग करणे.

६.४. विभागातील विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख, गांवठाणं / शहर मापन व विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख, तथा चौकशी अधिकारी गांवठाण / शहर मापन यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा ड्रोन द्वारे गांवठाण भूमापन कामासाठी वर्ग करुन प्रथम प्राधान्याने वापरण्यात याव्यात.

६.५. भूमि अभिलेख विभागाची पुनर्रचना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र.आस्था/१०९३/प्र.क्र.१९/ल-१, मंत्रालय मुंबई दिनांक १८/०८/१९९४ च्या शासननिर्णया प्रमाणे गांवठाण जमाबंदी प्रकल्पाकरिता स्वतंत्र कार्यालय निर्माण करण्यासाठी विभागातील अधिनस्थ कार्यालयाचा कामकाजाचा भार लक्षात घेवून प्रस्ताव सादर करावे.

६.६. जमाबंदी आयुक्त कार्यालयास वेळोवेळी प्रगती अहवाल सादर करणे.

स्वाक्षरी /-XXX
(एस. चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे

"निर्गमित"

23|11|2020

(बाळासाहेब काळे)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (ना.भू.) पुणे

## परिशिष्ट १ (पहा १.२.१.)
## सिमांकनाबाबत मार्गदर्शक नकाशा व वापराची कार्यपध्दती

१. चुना पावडरच्या लाईनची (मार्किंगची ) जाडी १० सेंटीमिटरपेक्षा कमी नसावी.

२. चुना पावडरच्या सहाय्याने अशा रीतीने सिमांकन करावे की, प्रत्येक मिळकतीचा(प्रॉपर्टीचा) बहुभूज (Complete Polygon) पूर्ण होईल.

३. खालीलप्रमाणे खूणा मिळकतीच्या प्रत्येक कोप-यावर चून्याने सिमांकित करण्यात याव्यात.



४. शक्यतो मिळकतीच्या सभोवताली हद्द समजण्यासाठी सलग रेषेचा (_____) वापर करावा.

५. गावठाण हद्दीचे कोपरे ⊕ या चिन्हांनी चिन्हांकित करावेत.

६. शासकीय, सार्वजनिक मिळकतीचे चुना पावडरच्या सहाय्याने अशाप्रकार सिमांकन करावे की ज्यामुळे त्या मिळकतीची संपूर्ण बहुभूज आकृती (Complete Polygon) तयार होईल.

७. शासकीय, सार्वजनिक मिळकत खाजगी मिळकतीच्या सिमालगत असल्यास खाजगी मिळकत व शासकीय सार्वजनिक मिळकत स्वतंत्रपणे ओळखता येवू शकेल या दृष्टीने चूनापावडरच्या सहाय्याने सिमांकन करावे.

८. खुली जागा, बखळ जागा, नाला व रस्त्याचे चूना पावडरच्या सहाय्याने सिमांकन करावे.

९. चूना पावडरच्या सहाय्याने खुल्या जागेचे सिमांकन करताना ग्रामपंचायत नमूना ८ मधील क्षेत्राचा विचार करण्यात यावा. प्रत्यक्ष कब्जा वहिवाटी मधील क्षेत्र नमुना ८ मधील नमुद क्षेत्रापेक्षा जास्त असेल (५% पेक्षा कमी / जास्त असल्यांस ते वगळून) तर त्याची नोंद ड्रोन नमुना क्रमांक १ मध्ये चौकशी अधीकारी यांच्या निदर्शनास आणणेसाठी घ्यावी.

१०. प्रस्तुत योजनेमध्ये मिळकतींचे सिमांकन हा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे सिमांकन अत्यंत काळजीपूर्वक व गांभिर्याने करावे. संपूर्ण मिळकतीचे चहुबाजुचे सिमांकन चुना पावडरने बहुभूज आकृती पूर्ण होईल अशा रितीने करण्याची दक्षता घ्यावी.

११. ग्रामपंचायत घर / मिळकत क्रमांक शक्य असल्यास घरांच्या छतांवर अथवा मिळकतीच्या हद्दीत घराच्या मागे किंवा पुढे अंगणामध्ये / जमिनीवर योग्य त्या साधनांच्या आधारे ड्रोन इमेजवर दिसेल अशा रितीने टाकावा. जमिनीवर घर क्रमांक टाकला असेल तर तो बाणाने कोणत्या मिळकतीचा आहे हे दर्शविणेत यावे.



Scanned by CamScanner

## परिशिष्ट २ (पहा १.२.१.१)

## मिळकतीचे सिमांकन केलेबाबत मिळकत धारकाचे निवेदन / स्वयंघोषणापत्र

मौजे--------तालुका-----जिल्हा----येथील भूमापनाची नोटीस मला/आम्हाला प्राप्त झाली आहे. ग्रामपंचायत मिळकत क्रमांक -------ही माझ्या/आमच्या ------हक्काने कायम कब्जात असुन सदर मिळकतीचा मी /आम्ही धारक आहे/आहोत. धारकांची नावे---------,--------,---------,सदर मिळकतीच्या बाहय हददीवर मी /आम्ही स्वत: चुन्याच्या सहाय्याने सिमांकन केले आहे. माझ्या /आमच्या मिळकतीचे सिमांकन करतांना व सिमांकनास लगत कब्जेदार यांनी कोणतीही हरकत घेतली नाही. त्यानुसार माझ्या /आमच्या मिळकतीच्या हददी मला/आम्हाला मान्य आहे. या प्रमाणे माझ्या/आमचे नगर /गांवठाण भूमापन अभिलेख तयार करण्यात यावे.

एकत्र /सहधारकाची नावे : - १------------------------------------------ २ ----------------------------------------

३------------------------------------ ४------------------------------------

ग्रामपंचायत मिळकत क्रमांक :- ग्रामपंचायत नमुना ८चे क्षेत्र :- __________ चौ.मि.

चतु:सिमा :-

कच्चा नकाशा :- ऐच्छिक




ठिकाण :-

दिनांक :-

संपुर्ण नाव / नांवे :-

पत्ता :- ______________________________

______________________________ स्वाक्षरी

दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक

टिप: ग्रामपंचायत घर क्रमांक उपलब्ध नसल्यास धारकांची नावे नमूद करावी.

---

### भूकरमापकाने / पथक प्रमुख यांनी भरावयाची माहिती

सदर मिळकतीच्या लगत धारकाने / _______________ यांनी

अ) मिळकतीच्या धारकाने केलेल्या सिमांकना बाबत हरकत घेतलेली आहे / नाही

ब) मिळकतीच्या धारकाने धारकत्वाबाबत केलेल्या दाव्याबाबत वाद आहे/नाही.

भूकरमापकाने / पथक प्रमुख यांचे नांव,
स्वाक्षरी व दिनांक



Scanned by CamScanner

## परिशिष्ट ३अ (पहा १.५.२.)

## ड्रोन उडविण्यापूर्वी भूकरमापक यांनी करावयाची पूर्वतयारीची पडताळणी सूची

गावाचे नाव : गावाचा एलजीडी कोड :

तालुका : गावठाणातील एकूण मिळकती :

जिल्हा :

| अ.क्र | तपशिल | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | गावठाण हद्द निश्चिती कामी मोजणी दिनांक | | |
| अ | हद्द कायम केलेचा दिनांक | | |
| २ | दवंडी देवून ग्रामसभा घेतलेचा दिनांक | | |
| अ | ग्रामसभेचा ठराव क्रमांक. | | |
| ब | ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेबाबतचे महत्व, फायदे व कार्यपध्दतीची माहिती नागरीकांना दिली आहे का? | | |
| क | ड्रोनद्वारे भूमापन करणेपूर्वी मिळकतीचे सिमांकन कसे करावे याबाबत नागरीकांना भूमि अभिलेख विभागाच्या मदतीने माहिती/प्रशिक्षण दिले आहे का? | | |
| ड | मिळकत रजिस्टरची एक प्रत व सॉफ्ट डेटा प्राप्त झाली आहे का ? | | |
| i. | सन २०११- होय / नाही | | |
| ii. | छायाप्रत उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | | |
| iii. | सॉफ्ट कॉपी उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | | |
| iv. | सध्याची महिना वर्ष | | |
| v. | छायाप्रत उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | | |
| vi. | सॉफ्ट कॉपी उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | | |

**(टिप : भूकरमापक यांनी सदर पडताळणी सूची ड्रोन उडविण्याच्या दिनांकापुर्वी किमान ३ दिवस अगोदर पुढील कार्यवाहीसाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावी.)**

**भूकरमापकाचे नाव, स्वाक्षरी**
**व कार्यालयाचे नाव**



Scanned by CamScanner

**परिशिष्ट ३ब (पहा १.५.२.)**

## ड्रोन उडविणेचे आदल्यादिवशी भूकरमापक यांनी करावयाच्या तयारीची पडताळणी सूची

गावाचे नाव :　　　　गावाचा एलजीडी कोड :

तालुका :　　　　गावठाणातील एकूण मिळकती :

जिल्हा :

| अ.क्र | तपशिल | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सिमांकन करणा-या पथक प्रमुखाचे नाव | | |
| २<br>अ<br>ब.<br>क. | ग्रामसेवक यांनी स्थानिक स्तरावरुन किती मजूर उपलब्ध करुन दिले —<br>संख्या<br>केव्हा उपलब्ध करुन दिले.-<br>किती दिवसासाठी उपलब्ध करुन दिले | | |
| ३ | मिळकत सिमांकनाचा दिनांक | | |
| ४<br><br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | सर्व खाजगी मिळकतींचे तसेच सार्वजनिक मिळकतींचे विहित पध्दतीने सिमांकन झाले आहे का?<br>एकूण मिळकती -<br>सिमांकन झालेल्या खाजगी मिळकती / एकूण खाजगी मिळकती -<br>सिमांकन झालेल्या सार्वजनिक मिळकती / एकूण सार्वजनिक मिळकती-<br>सिमांकन झालेल्या शासकिय मिळकती/ एकूण शासकिय मिळकती - | | |
| ५ | सिमांकनाबाबतचे एकूण अनिर्णयीत वाद | | |
| ६<br>अ.<br>ब.<br>क. | दुहेरी चुन्याचे सिमांकन झाल्याचे एकूण मिळकती<br>खाजगी मिळकती<br>शासकीय मिळकती<br>सार्वजनिक मिळकती | | |
| ७ | सर्व मिळकतींचे सिमांकन विहित कार्यपध्दतीनुसार पूर्ण झाले आहे किंवा कसे | | |

**सिमांकन प्रमाणपत्र (पहा १.२.१.९.)**

प्रमाणित करण्यात येते की, मौजे --------- तालुका -------- जिल्हा-------- या गावाचे गावठाण हद्दीतील सर्व खाजगी, सार्वजनिक व शासकीय मिळकतींचे व प्रत्येक मिळकतीचे चोहोबाजुचे सिमांकन पूर्ण करण्यात आलेले आहे. ड्रोन फ्लाईंग करण्यास हरकत नाही.

ठिकाण :　　　　**भूकरमापकाचे नाव, स्वाक्षरी**

दिनांक :　　　　**व कार्यालयाचे नाव**

**(टिप : भूकरमापक यांनी सदर पडताळणी सूची सिमांकन प्रमाणपत्रासह ड्रोन उडविण्याच्या अगोदरच्या दिवशी** संध्याकाळी पुढील कार्यवाहीसाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावी)



Scanned by CamScanner

परिशिष्ट ३क (पहा १.५.२.)

## ड्रोन उडविल्यानंतर भूकरमापक यांनी करावयाच्या कार्यवाहीचा पडताळणी सूचीचा नमुना

गावाचे नाव :
तालुका :
जिल्हा :

गावाचा एलजीडी कोड :
गावठाणातील एकूण मिळकती :

| अ.क्र | तपशिल | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | झाडाखालील मिळकतीची मोजणी दिनांक | | |
| २ | झाडाखालील मोजणी केलेल्या मिळकतीची संख्या | | |
| ३ | ग्राऊंड ट्रुथिंगसाठी मोजणी केलेचा दिनांक | | |
| ४ | ग्राऊंड ट्रुथिंगसाठी मोजणी केलेल्या मिळकतीची संख्या | | |

(टिप : भूकरमापक यांनी सदर पडताळणी सूची ड्रोन उडविल्याच्या दिनांकानंतर कमाल ३ दिवसामध्ये पुढील कार्यवाहीसाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावी)

भूकरमापकाचे नाव, स्वाक्षरी
व कार्यालयाचे नाव



Scanned by CamScanner

## परिशिष्ट ३ड (पहा १.५.२.)

## चौकशीकाम पूर्ण झालेनंतर भूकरमापक यांनी सादर करावयाचा पडताळणी सूचीचा नमुना

गावाचे नाव :
तालुका :
जिल्हा :

गावाचा एलजीडी कोड :
गावठाणातील एकूण मिळकती :

| अ.क्र | तपशिल | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | नमुना अ नोटीस पाठविल्याचा दिनांक | | |
| २ | चौकशीचा दिनांक | | |
| ३ | नमुना ब ची नोटीस पाठविल्याचा दिनांक | | |

(टिप : भूकरमापक यांनी सदर पडताळणी सूची चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावी)

**भूकरमापकाचे नाव, स्वाक्षरी**
**व कार्यालयाचे नाव**



Scanned by CamScanner

## परिशिष्ट ४ (पहा ४.१.२.३.)
## नमुना नंबर ८ चा डाटा तयार करण्यासंबंधी कार्यपध्दती

१. गावठाण जमाबंदी प्रकल्पाकरीता कर आकारणी नोंदवही {Tax Assessment Register (नमुना ८)} अद्यावत करून भूमि अभिलेख विभागास उपलब्ध करून देण्याकरीता कार्यपध्दती, ई – ग्राम सॉफ्टवेअर मध्ये नमुना ८ ची माहीती अदयावत करताना खालील सुचनांचे पालन करावे.

१.१. मालकाचे व भोगवटादाराचे नांव लिहीताना पूर्ण नांव (पहिले नांव, मधले नांव, शेवटचे नांव) लिहावे.

१.२. मालकाच्या व भोगवटादाराच्या नावामध्ये कुटूंब प्रमुखाशी असलेले नाते किंवा फक्त पहिले नांव न लिहीता पूर्ण नांव लिहावे. तसेच मालकाच्या व भोगवटादाराच्या नावाचा रकाना रिकामा ठेवू नये.

१.३. मालकाच्या व भोगवटादाराच्या नावामध्ये एकापेक्षा अधिक नांवे असतील तर प्रत्येक नावानंतर स्वल्पविराम (Comma) दयावा.

१.४. नावाच्या रकान्यात कोणत्याही विशेष प्रतिकांचा {Special symbols (- , ' , _ , : , /)} वापर करू नये.

१.५. गावाच्या नावाच्या रकान्यात प्रत्येक गावातील नोंदीसमोर त्या त्या गावाचे नाव व गावाचा कोड लिहावा.

१.६. मालमत्तेच्या वर्णनामध्ये जर फक्त बांधकाम किंवा बांधकाम व मोकळी जागा असेल तर त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. व त्याची मोजमापे स्पष्टपणे लिहीलेली असावीत. तसेच मालमत्तामध्ये एकापेक्षा अधिक मजले असतील तर त्याचाही उल्लेख असावा.

१.७. मालमत्तेचे क्षेत्रफळ चौरस मिटरमध्ये असावे. तसेच क्षेत्रफळाचा रकाना रिकामा ठेवू नये. क्षेत्रफळ इंग्रजी अंकातच नमूद करावे. त्यामध्ये दुसरी कोणतीही माहिती नमूद करू नये. क्षेत्रफळ शून्य असू शकत नाही, त्यामुळे क्षेत्र शून्य लिहू नये.

१.८. क्षेत्रफळ रकान्यात एकच क्षेत्र नमूद करावे. २२.९०, ३५.१० चौ.मि. असे क्षेत्र एकाच ग्रामपंचायत घरक्रमांकाप्रमाणे नमूद न करता एकत्रित क्षेत्रफळ लिहावे. (५८.०० चौ.मि.) असे लिहावे.

१.९. मालमत्ता क्रमांक दुबार असू नये. एका ओळीत एकाच मालमत्तेची माहिती लिहावी.

१.१०. माहिती भरताना सकल मराठी किंवा मंगल युनिकोड फॉन्टचा वापर करावा.

१.११. ग्रामपंचायत नमूना ८ मध्ये कर आकारणी नोंदवही अदयावत करण्याच्या दृष्टीकोनातून मालमत्तेचा तपशील जसे कच्चे पक्के बांधकाम, नवे जुने बांधकाम, मिळकतीचा वापर इ. नमूद करावा.

१.१२. धारकाचा मोबाईल नंबर व धारकाचा पत्ता नमूद करावा.

## ड्रोन नमुना क्रमांक १
## सिमांकनाबाबत विवादाची नोंदवही (पहा १.२.१.५.)

गावाचे नाव ---------- तालुक्याचे नाव-------------- जिल्हयाचे नाव----------

| अ.क्र | धारकाचा तपशील | | | हरकतदाराचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | चालता क्रमांक | घर/मिळकत क्रमांक | नाव | चालता क्रमांक | घर/मिळकत क्रमांक | नाव | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

टिप- १) नांवे नमुद करतांना प्रथम नांव, मधले नांव व आडनांव अशा स्वरुपांत लिहावे.

## ड्रोन नमुना क्रमांक २
## टाचन नोंदवही_(पहा १.२.१.६.)

गावाचे नाव------------ तालुक्याचे नाव----------- जिल्हयाचे नाव----------

| अ.क्र | चालता क्रमांक | घर/मिळकत क्रमांक | धारकाचे नाव | टाचणचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कोणा समक्ष सिमांकन केले त्यांचे नांव | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

टिप- १) खाजगी मिळकत धारकाने, गावात न राहण्याऱ्या मिळकत धारकाने सिमांकन न केल्यास त्या मिळकतीचे सिमांकन ग्रामसेवकाच्या अथवा शेजारील मिळकत धारक अथवा माहीतगार व्यक्ती यांच्या मदतीने ग्रामपंचायत नमुना नंबर ८ चे क्षेत्रास मेळ घेऊन केले असल्यांस सदरच्या टाचन नोंदवही मध्ये तपशील नमुद करावा.
२) नांवे नमुद करतांना प्रथम नांव, मधले नांव व आडनांव अशा स्वरुपांत लिहावे.